# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज
मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 296 /2024-25 दि. 04/06/2024

संदर्भ :- 1) जा.क्र.मनपा/आस्था/2309/2023-24, दि.27/12/2023 रोजीचे परिपत्रक.
2) जा.क्र.मनपा/आस्था/47/2024-25, दि.15/04/2024 रोजीचे परिपत्रक.
3) जा.क्र.मनपा/आस्था/246/2024-25, दि.27/05/2024 रोजीचे परिपत्रक.

## परिपत्रक

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर विविध विभागात ठेका पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करणेबाबत संबंधित ठेकेदार यांना अवगत करणेबाबत सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांना दि.27/12/2023 व दि.15/04/2024 रोजीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत काही ठेका कर्मचारी यांची चारित्र्य पडताळणी झालेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

ठेका कर्मचाऱ्यांचे एकत्रित चारित्र्य पडताळणी अहवाल एकत्रित करुन आस्थापना विभागात दि.01/06/2024 पर्यंत सादर करणेत यावेत. ज्या ठेका कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी अहवाल दि.01/06/2024 पर्यंत जमा होणार नाही त्या कर्मचाऱ्यांस दि.01/06/2024 नंतर चारित्र्य पडताळणी अहवाल सादर होत नाही तोपर्यंत कामावर हजर करुन घेण्यात येऊ नये, असे संदर्भ क्र.03 च्या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात आले होते.

तरी ज्या कर्मचाऱ्यांनी दि.01/06/2024 पूर्वी चारित्र्य पडताळणी दाखला सादर केलेला नाही परंतु सदरचे कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहून कार्यालयीन कामकाज करीत आहेत, अशा कर्मचाऱ्यांची यादी तसेच ज्या कर्मचाऱ्यांना कामावर हजर होऊ दिले नाही अशा कर्मचाऱ्यांची यादी तात्काळ आस्थापना विभागास ई-मेलव्दारे कळविण्यात यावी. जे कर्मचारी चारित्र्य पडताळणी दाखला सादर न करुनसुध्दा अद्याप कार्यालयात उपस्थित राहून कार्यालयीन कामकाज करीत आहेत, अशा कर्मचाऱ्यांना दि.01/06/2024 नंतरच्या कालावधीतील वेतनाची जबाबदारी संबंधित विभागाचे उप-आयुक्त यांची राहील.

04.6.24

(रवि पवार)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-
उप-आयुक्त (सर्व)

११

Z:\आस्थापना विभाग\परिपत्रक\चारित्रपडताळणी परिपत्रक.doc